दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ●मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 23 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 38 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## पैठणमध्ये ५० घरांत शिरले पाणी

**छत्रपती संभाजीनगर**–छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही पहाटेपासून जोरदार पाऊस सुरू आहे. कन्नड तालुक्यात वाकी नदीला पुन्हा पूर आला आहे. पैठण शहरात देखील कहारवाडासह अनेक भागातील घरात पाणी शिरले. तर जायकवाडी, राहुलनगर येथील ५० घरात पाणी शिरल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.मागील आठ दिवसांत पैठण तालुक्यात सतत धार पावसाची सुरू आहे, यामुळे शेती अद्याप पाण्याखाली असतानाच आज सोमवारी पहाटे पासून मुसळधार पाऊस सुरू झाल्याने जायकवाडी, राहुलनगर या भागातील अनेक घरात गुढ्यापर्यंत पाणी साचले आहे, या ठिकाणी प्रशासनाने चार दिवसांपूर्वी पाहणी केली. मात्र कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्याने आज सुरू असलेल्या पावसाने पुन्हा अनेक घरात पाणी शिरले आहे.

# मराठवाड्यात पावसाचा हाहाकार
# ओढे-नद्यांना पूर, शेती पाण्याखाली

## घरांमध्ये शिरले पाणी,अनेक गावांचा संपर्क तुटला; लोक पुरात अडकले


छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)–राज्यात सर्वदूर पावसाचा हाहाकार सुरू असून, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राला ढगफुटीसदृश्य पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. या अवेळी आलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक हिरावून घेतले असून, शेतीतलाव, ओढे, नद्यांना पूर आल्याने अनेक गावांमध्ये पाणी शिरले आहे. लातूर, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली या जिल्ह्यांना पावसाचा मोठा तडाखा बसला आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांना नदीचे स्वरूप आले आहे. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

### माजलगाव धरणाचे ११ दरवाजे उघडले

माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्याने धरणातून सिंदफणा नदीत मोठा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. धरणाचे ११ दरवाजे उघडण्यात आले असून, ६२,००० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पाण्याची आवक पाहता विसर्ग कमी-जास्त केला जाऊ शकतो, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

### बीडलाही पावसाने झोडपले शिरूर गाव पाण्यात

विश्रांती घेतलेल्या पावसाने रविवारी मध्यरात्री बीड जिल्ह्याला पुन्हा एकदा झोडपून काढले. शिरूर कासारमध्ये मुसळधार पावसामुळे सिंदफणा नदीला पूर आला असून, नदीचे पाणी बाजारपेठा आणि घरांमध्ये शिरले आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. शिरूर येथील सिंदफणा नदीने रौद्ररूप धारण केल्यामुळे अनेक घरे आणि दुकाने पाण्याखाली गेली आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.




### परभणी, लातूर जालन्यात शेतकरी संकटात

परभणी जिल्ह्यात रविवारी रात्री झालेल्या वादळी पावसाने पारंपरिक आणि नगदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. लातूरमध्ये मध्यरात्रीपासून सुरू असलेल्या धुवांधार पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. भेटा-आंदोरा गावाचा संपर्क तुटला असून, रात्रभर झालेल्या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. जालन्यात नद्या-नाले ओसंडून वाहत असून शेती पाण्याखाली बुडाली आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे आणि अंबड तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

### अंबडमध्ये मागणी नदीला पूर

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात रविवारी मध्यरात्री झालेल्या पावसामुळे मागणी नदीला पूर आला असून, नालवाडी शिवारातील साठवण तलाव भरून वाहत आहे, त्यामुळे गावात पाणी शिरले आहे. तसेच, रेनापुरी, दयाळा, भांबेरी या गावांचा संपर्क तुटला आहे.

## महाधरणे आंदोलनात सहभागी व्हा-जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**

गायरान धारकांच्या न्याय व हक्कांसाठी भव्य महाधरणे आंदोलन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-), जिल्हा बीड च्या वतीने युवा रिपाईचे प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली हे ऐतिहासिक आंदोलन शेतकऱ्यांच्या गायरान जमिनीच्या हक्कासाठी होत आहे. आणि यामध्ये हजारो शेतकरी आणि कार्यकर्ते सहभागी होणार आहे. या आंदोलनात, समाज बांधव आणि रिपब्लिकन कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहावे असे आव्हान रिपाईचे विलास जोगदंड यांनी केले आहे. एकत्र येऊन गायरान धारकांचे हक्क मिळवण्यासाठी सामूहिक आवाज उठवण्याची ही एक ऐतिहासिक आणि महत्त्वाची संधी आहे. दिनांक: २३ सप्टेंबर २०२५ वेळ: सकाळी ११:०० वाजता स्थळ: जिल्हाधिकारी कार्यालय, नगर रोड, बीड हे आंदोलन शेतकऱ्यांच्या गायरान जमिनीच्या हक्कांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते एकत्र येणार आहेत.आंदोलनाच्या यशासाठी तुमची उपस्थिती अनिवार्य आहे!आपला सहभाग हाच आपल्या हक्कांसाठीचा आवाज आहे! चला, एकत्र येऊ आणि गायरान धारकांना न्याय मिळवून देऊ!



### बीड रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे

## मागणीसाठी भीमसैनिक प्रेम कांबळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे फाशी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला

**बीड । प्रतिनिधी**

बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे करीता गेली अनेक दिवसापासून आंबेडकरवादी अनुयाया कडून संविधानीक मार्गान जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर उपोषण आंदोलन करून मागणी वारंवार केली जात आहे. पालकमंत्री ना.अजित (दादा) पवार यांना देखील निवेदने देऊन मागणी केली मात्र जिल्हा प्रशासन, पालकमंत्री हे याकडे दुर्लक्ष करत असल्याचे आंबेडकरवादी अनुयायी यांच्या कडून सांगीतले जात आहे. १७ सप्टेंबर रोजी बीड रेल्वे स्थानकाचे उद्घाटन करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस, उपमुख्यमंत्री बीड चे पालकमंत्री अजित (दादा) पवार, यांच्या हस्ते बीड रेल्वे चे उद्घाटन झाले. यावेळी देखील आंबेडकरवादी अनुयायांनी बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे करीता मागणी केली. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी शासन प्रशासन ठोस पावले उचलत नसल्याचे सांगत बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी भीमसैनिक प्रेम कांबळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे रात्री ९.३० च्या दरम्यान फाशी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.

## चोरी गेलेल्या ५ मोटारसायकली हस्तगत शहादा पोलिसांची उत्कृष्ट कामगिरी!



**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहादा जि. नंदुरबार येथून चोरी झालेल्या मोटारसायकलींचा तपास करताना, शहादा पोलिसांनी एक मोठी कारवाई केली आहे. एका गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी एकूण ५ मोटरसायकली हस्तगत केल्या असून, त्यांची किंमत १,१९,००० रुपये आहे.विजय पाटील यांच्या हिरो कंपनीच्या मोटारसायकल चोरीची तक्रार दाखल झाल्यानंतर, पोलिसांनी तपास सुरू केला. पोलीस निरीक्षक निलेश देसले यांना मिळालेल्या माहितीनुसार, चोरीची मोटारसायकल मंदाणे येथे एका व्यक्तीकडे असल्याची खात्री मिळाली. या माहितीच्या आधारे, पोलिसांनी डी.बी. पथकासह तात्काळ कारवाई करत सुकदेव साईनाथ तडवी (वय २५, रा. बिजरीगव्हाण) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी सुकदेवची कसून चौकशी केली असता त्याने मोटरसायकल चोरीची कबुली दिली. अधिक तपास केल्यावर त्याने इतर ४ चोरीच्या मोटरसायकली सोनवद गावाजवळील एका शेतात लपवून ठेवल्याची माहिती दिली. पोलिसांनी तातडीने त्या ठिकाणी जाऊन त्या सर्व गाड्या जप्त केल्या.

ही यशस्वी कामगिरी नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे आणि शहादा उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात पोलीस निरीक्षक निलेश देसले, पोलीस उपनिरीक्षक भुनेश मराठे, श्रेत्र पोलीस उपनिरीक्षक प्रदीप राजपूत, पोलीस हेड कॉन्स्टेबल योगेश थोरात, साहेबराव खांडेकर, दिपक चौधरी, पोलीस कॉन्स्टेबल भगवान सावळे आणि प्रदीप वाघ यांचा समावेश होता.या कामगिरीमुळे चोरीच्या गुन्ह्यांना आळा बसण्यास मदत होईल.

## अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटनेच्या वतीने पत्रकारावरील हल्ल्याचा तीव्र निषेध-आत्मलिंग शेटे

### पत्रकारांवरील हल्ल्याचे राज्यभर तीव्र पडसाद

**बीड । प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथे वार्तांकनासाठी गेलेल्या झी २४ तास चे ब्युरो चीफ योगेश खरे, साम टीव्ही चे ब्युरो चीफ अभिजित सोनवणे आणि पुढारी न्यूज चे ब्युरो चीफ किरण ताजने यांच्यावर स्वामी समर्थ केंद्राजवळ गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी दगडफेक व मारहाण केली. या हल्ल्यात किरण ताजने गंभीर जखमी होऊन रुग्णालयात दाखल झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या अमानुष घटनेचा अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटना यांच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे.

यាप्रकरणी जिल्हाधिकारी मार्फत राज्याचे मुख्यमंत्री निवेदन व योग्य कारवाई करून पत्रकारांना द्या अशी मागणी.

पत्रकारांवर होणारे असे वारंवार हल्ले ही लोकशाहीस काळिमा फासणारी व चौथ्या स्तंभावर सरळ आघात करणारी बाब आहे. पत्रकार समाजातील सत्य घटनांचा आवाज बनतात, अन्याय, भ्रष्टाचार व सामाजिक प्रश्न प्रकाशात आणतात. अशा व्यक्तींवर हल्ले होणे असह्य असून लोकशाहीतील



गंभीर धोक्याचे लक्षण आहे. याबाबत अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटना चे मराठवाडा अध्यक्ष यांनी पत्रकारांवर होणारे हल्ले कधीही सहन केले जाणार नाहीत. दोषींना तातडीने अटक करून कठोर शिक्षा झाली पाहिजे. मुख्यमंत्री व गृह विभागाने याकडे गांभीर्याने पाहावे, अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटना राज्यभर उग्र आंदोलन उभारेल.

संपादकीय

# स्वदेशीचा नारा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज घटस्थापनेच्या मुहूर्तावर भारतीय लोकांना स्वदेशीचा नारा दिला. जीएसटी २.०ची घोषणा करताना हा स्वदेशीचा नारा दिला. याला फार मोठा अर्थ आहे. स्वदेशीचा नारा हा नुसता नारा नाही तर भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र म्हणून उभे करण्याच्या मोदींच्या योजनेची ही सुरुवात आहे. स्वदेशी चळवळ सुरू झाली ती बंगाल फाळणीचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीवरून. तिचा उद्देश ब्रिटिश वस्तूंवर बहिष्कार टाकून स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन देणे हा होता. पण आज त्याचे महत्त्व यानिमित्ताने पटत आहे. कारण अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प यांनी भारतासह ब्राझील आणि कैक देशांवर टॅरिफ लावण्याचा आत्मघातकी निर्णय घेतला आहे. पण राष्ट्रवादाची भावना वाढवण्यासाठी त्यावेळी म्हणजे स्वातंत्र्य मिळवण्याआधी स्वदेशी चळवळीचा उपयोग झाला असला तरीही नंतर मात्र आर्थिक उदारीकरणामुळे भारताचे वाढते महत्त्व आणि भारताचे महत्त्व कमी करण्यासाठी ट्रम्प यांनी हा निर्णय घेतल्याचे बोलले जाते. त्याला शह म्हणून मोदी यांनी स्वदेशीचा नारा दिला. स्वदेशी चळवळीच्या महत्त्वातच आत्मनिर्भर भारत निर्माण करण्याचे मोदी यांचे आणखी एक उद्दिष्ट साध्य करण्याची आकांक्षा दडली आहे आणि त्यामुळे अशा उपक्रमांना प्रेरणा मिळते. खरे तर स्वदेशीचे महत्त्व तेव्हाही होते. गांधी यांनी स्वदेशी चळवळ सुरू केली आणि तेव्हा स्वदेशीचे महत्त्व लोकांना पटू लागले. पण नंतरच्या काँग्रेस नेत्यांनी या स्वदेशी चळवळीला तिलांजली दिली आणि जरी खादी ग्रामोद्योगसारखे उपक्रम सुरू केले असले तरीही काँग्रेसचे नेते आलिशान पोषाखात आणि परदेशी वस्तूंचा वापर करत राहिले. त्यांचा प्रभाव आपण पाहात राहिलो आणि त्यांनाच मते देत राहिलो. पण मोदी यांनी आता काँग्रेसला चांगलेच उत्तर दिले आहे आणि काँग्रेस देशातून भुईसपाट झाली. पण काँग्रेसचे जे चांगले विचार होते ते मोदी यांनी स्वीकारले.स्वदेशी चळवळ ही ब्रिटिश धोरणांना विरोध म्हणून सुरू झाली, तर आताची स्वदेशी चळवळ ही ट्रम्प यांच्या धोरणांना उत्तर म्हणून सुरू करण्यात येत आहे. पण मोदी यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ स्वदेशी चळवळ इतक्यावरच थांबले नाहीत, तर भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या मूलमंत्राला त्यांनी स्थान दिले आणि 'वन नेशन वन टॅक्स' हा मूलमंत्र लागू केला. त्यामुळे आता जीएसटी म्हणजे वस्तू आणि सेवा कराचे दोन टप्पे लागू असतील. त्यानुसार केवळ पाच टक्के आणि १८ टक्के असे दोनच कर स्लॅब असतील. यामुळे कर प्रणालीत सुसूत्रता येईल आणि लोकांनाही नवीन कर प्रणाली सहज समजेल. वन नेशन वन टॅक्स यामुळे देश डझनभर करांच्या जाळ्यातून मुक्त झाला. मोदी सरकारचे ब्रीद 'नागरिक देवो भव:' असे आहे आणि त्यातूनच मोदी सरकार नवनव्या सुधारणा पुढे आणत आहे, असे म्हणता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीएसटी करातील सुधारणा या देशाच्या अर्थसंकल्पाला नवे गतिमान देणाऱ्या ठरतील यात काही शंका नाही. अंदाजे अडीच लाख कोटी रुपयांची वार्षिक बचत या बदलांमुळे थेट ग्राहकांच्या खिशात पडणार असून हा पैसा पुन्हा बाजारपेठेत वळेल असा अंदाज आहे. मागणीला त्यामुळे प्रोत्साहन मिळेल आणि अर्थव्यवस्थेचे गाडे चालू राहील अशी दुसरी सकारात्मक बाजू आहे. आता जीएसटीतील बदलांमुळे रोजच्या वापरातील औषधे, घरगुती वापराच्या वस्तू, विमा सेवा यावरील जीएसटी कमी होईल आणि लोकांची क्रयशक्ती वाढेल. महागाईवर अंकुश बसेल. असे चांगले सकारात्मक परिणाम मोदी यांच्या जीएसटी २.० योजनेमुळे भारतीय ग्राहकांना चांगले दिवस येतील. मध्यमवर्गीय कुटुंबाचा बजेटवर ताण पडतो तो महागाईमुळे. तो कमी झाल्यामुळे आपोआपच ग्राहकांची क्रयशक्ती वाढेल आणि ते अन्यत्र खर्च करू शकतील. म्हणजे दुसरा साधा अर्थ काय तर मागणी वाढल्यामुळे अर्थचक्राचे गाडे सुरू राहील. मोदी यांची स्वदेशीचा नारा हा अशा वेळेला आला आहे, की ज्यावेळी ट्रम्प यांच्यासारख्या भारतविरोधी नेत्यांनी भारतावर अवाच्या सव्वा टॅरिफ लागू केला आहे. त्याला मोदी यांनी दिलेले हे उत्तर आहे. कारण जनतेच्या हातात पैसा आला, की बाजारात तेजी येते आणि अर्थव्यवस्थेला गती येते. तेच आताही दिसणार आहे. यामुळे लहान-मोठ्या व्यवसायांना गती येईल आणि बाजारात चैतन्य येईल. यालाच गुणक परिणाम म्हणतात. सर्व स्तरांतून या निर्णयाचे स्वागत होत आहे यावरून हा निर्णय देशासाठी चांगला आहे हे मान्य करावे लागेल. कारण जीएसटी आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के राहील. याचा परिणाम व्यापारी वर्गावर जास्त होणार आहे, कारण त्यांच्यावर या निर्णयाचा सर्वात चांगला परिणाम होणार आहे.अर्थात हे सर्व असले तरीही राजकारणापासून जीएसटी सुधारणाही सुटल्या नाहीत. काँग्रेसला भाजपचे काहीच चांगले दिसत नाही, त्यामुळे त्यांनी यावर टीका करणे क्रमप्राप्तच होते. पण ममता बॅनर्जी आणि बिहारमधील विरोधी नेते यावर टीका करत आहेत. कारण हा चांगला निर्णय मोदी यांचा आहे. ही श्रेयवादाची लढाई आहे. ममता यांनी आपल्या सरकारला याचे श्रेय जाते असे म्हटले आहे. पण त्यांनी असे म्हणणे हे श्रेयवादाच्या लढाईत त्यांचा पराभव दिसत असल्यामुळे आहे हे खरेच आहे. जीएसटी ही संकल्पना प्रथम स्वर्गीय अरुण जेटली यांनी मांडली आणि तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदीच होते. त्यामुळे यांचे श्रेय घेण्याचे प्रयत्न निव्वळ श्रेय लाटण्याचे आहे. पण आता जीएसटी सर्वमान्य झाली आहे आणि आता तर जीएसटी २.० ही आली आहे. मोदी यांचा हा निर्णय देशाच्या भल्यासाठी आहे आणि जनतेच्या अंतिम कल्याणासाठी आहे. कारण कोणताही निर्णय शेवटी जनतेच्या कल्याणासाठीच करायचा असतो. मोदी हे सर्व चांगले जाणतात आणि त्यामुळे त्यांनी हा निर्णय अमलात आणला आहे. फ्रान्सने सुरू केलेला ही संकल्पना आज सर्व जगाची ओळख बनली आहे आणि स्वदेशीच्या नाऱ्याची याला जोड देऊन मोदी यांनी मास्टर स्ट्रोक मारला, हे मान्य करायलाच हवे. कारण आर्थिक स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे, मोदी यानी ते ओळखले आहे.

# प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते ७ व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे होणार उद्घाटन

## संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक अजयकुमार गंडले यांची निवड

**परळी । प्रतिनिधी**

परळी येथे १६ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या ७ व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी व विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते होणार आहे.तरसंमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत अजयकुमार गंडले यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती मुख्य संयोजक रानबा गायकवाड व स्वागत समितीच्या वतीने देण्यात आली आहे.परळी वैजनाथ येथील लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिरात दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी शिक्षण मार्गच्या वतीने एकदिवसीय साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता होणार आहे. संमेलनात परिसंवाद, कथाकथन, कवी संमेलन आदी भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. तर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा शिक्षक गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

या संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी व विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते होणार आहे. प्रभाकर साळेगावकर यांचे वादळ (कविता संग्रह) हळवे ठसे( हायकूसंग्रह) तूच आमची शान (बालकविता संग्रह) आंघोळीचे झाड (बालकथा संग्रह) तसेच पाणी बाणी हा संपादित कवितांचा संग्रह प्रकाशित झालेला आहे. कवी ,विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांना त्यांच्या साहित्य लेखनाबद्दल आचार्य अत्रे आद्य विडंबनकार राज्यस्तरीय पुरस्कार, यशवंत साहित्य गौरव पुरस्कार ,उत्कृष्ट वांडमय निर्मिती पुरस्कार नागोठाने जिल्हा सांगली, लोकसंवाद पुरस्कार उंमरी ,जिल्हा नांदेड, सुबदा प्रतिष्ठान ,सेलू यांचा वांडमय पुरस्कार, स्वर्गीय प्रमोद महाजन साहित्य पुरस्कार, लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार आदी पुरस्काराने आतापर्यंत सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील विद्यापीठाच्या प्रथम वर्ष मराठी पुस्तकात हायकूचा समावेश करण्यात





आलेला आहे. एशियन पोएट्रीमध्ये मराठीतील कवी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रात तसेच गोवा राज्यातील अनेक साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून यांची उपस्थिती लाभलेली आहे. संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले अजयकुमार गंडले हे परभणी येथील भदंत उपाली हायस्कूल येथे इंग्रजी विषयाचे शिक्षक आहेत. व्याख्याते, विचारवंत म्हणून त्यांची सर्वदूर ख्याती आहे.त्यांचा नवराष्ट्र निर्माते: डॉ.बाबासाहेब आंबेडकर हा ग्रंथ प्रकाशित झालेला आहे. तर विश्व मानवतावादाचे आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा ग्रंथ लवकरच प्रकाशित होणार आहे. अजयकुमार गंडले यांचे धर्मयुद्धातील वणवा, साक्षरता काळाची गरज, व्यसनाधीनता व आजचा युवक, अंधारातून प्रकाशाकडे, डॉ. बाबासाहेबांचे राष्ट्रप्रेम, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच महिलांचा सन्मान, भारतीय संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वोच्च योगदान,तसेच दैनिक सम्राटचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तरी जयंती महोत्सव निमित्ताने युनोमध्ये प्रकाशित झालेल्या महा विशेषंकामध्ये लेख प्रकाशित झालेला आहे. याबरोबरच शेतकरी, कामगार, महिला, उपेक्षित, सामाजिक, शैक्षणिक विषयांवर त्यांनी लेखन केले आहे.साहित्यिक अजयकुमार गंडले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य पुरस्कार नागपूर येथील भारतीय बहुजन समाज पुरस्कार अमरावती तसेच महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कारांसह गौरविण्यात आलेले आहे.

# पनवेलमध्ये नमो युवा रनचे भव्य आयोजन

# स्वस्थ व नशामुक्त भारतासाठी युवा शक्तीचा निर्धार

## सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या हस्ते नमो युवा रनचे उदघाटन; आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने स्वस्थ आणि नशामुक्त भारताच्या निर्मितीसाठी या शीर्षकाखाली आज (दि. २१) पनवेलमध्ये नमो युवा रनचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या धावस्पर्धेत जिल्ह्यातील विविध भागांतून हजारो युवक-युवतींनी आणि उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सकाळच्या प्रसन्न वातावरणात सहभागी युवकांनी 'फिट इंडिया' चा नारा देत व्यसनमुक्त जीवनशैलीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविला. शहरातील सुंदर अशा वडाळे तलाव येथून तीन किलोमीटर अंतराच्या या नमो युवा रनचे उदघाटन नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ ३ चे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन




> देशाचे लोकप्रिय व कणखर नेतृत्व नरेंद्र मोदीजींनी देशाला 'फिट इंडिया' आणि 'ड्रग फ्री इंडिया'कडे नेण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्याच प्रेरणेतून आजच्या युवकांनी समाजाला योग्य दिशा देणे हे आपले कर्तव्य आहे. नमो युवा रन हा त्याच उद्दिष्टाचा भाग आहे.
> – आनंद ढवळे, अध्यक्ष– युवा मोर्चा, उत्तर रायगड जिल्हा.

कोळी, राजेश भगत, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, पनवेल उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, अनेश ढवळे, कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, सोशल मीडिया संयोजक सुशील शर्मा, जगदिश घरत, अमित ओझे, अभिषेक पटवर्धन, प्रीतम म्हात्रे, केदार भगत, रुपेश नागवेकर, प्रशांत मोरबाळे, विनेश कदम, अशोक साळुंखे, चिन्मय समेळ, अक्षय सिंग, मयूर कदम, तेजस जाधव, नितेश पाटील, देवांशू प्रभाळे, कोमल कोळी, शिवानी घरत, यांच्यासह पदाधिकारी, विविध संस्था संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. या स्पर्धेनंतर विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्व धावपटूंचे अभिनंदन करून त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. तसेच या उपक्रमामुळे युवकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होऊन नशामुक्त समाजाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यात आल्याचे मान्यवरांनी नमूद केले. युवक, युवती आणि महिलांची उपस्थित मोठ्या प्रमाणात व लक्षणीय होती. यावेळी आयोजकांकडून स्पर्धकांचे स्वागत करून त्यांना स्पर्धेसाठी प्रोत्साहन देण्यात आले. यावेळी स्पर्धकांचा उत्साह वाढविण्यासाठी उत्साह, आनंद आणि सामूहिक तालमेल यावर आधारित झुम्बा आयोजित करण्यात आले होते. नमो युवा रन अत्यंत शिस्तबद्ध, उत्साही आणि यशस्वी वातावरणात पार पडली, त्यामुळे हा उपक्रम युवकांमध्ये आरोग्य, क्रीडाभावना, सामाजिक जबाबदारी आणि व्यसनमुक्त जीवनशैली याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. या नमो युवा रन मध्ये पुरुषांच्या गटात राज भगत यांनी प्रथम, सुहास माळी यांनी द्वितीय आणि विकास ठिकडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तसेच महिलांच्या गटात प्रथम क्रमांक जान्हवी चोगले, द्वितीय क्रमांक प्रथमा भगत आणि तृतीय क्रमांक काजळ प्रजापती यांनी पटकावला.

# मराठवाडा मित्र परिवार तर्फे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा

## मरणानंतर माणसाची जात पुसणारा अवलिया कांतराव देशमुख



**पनवेल । प्रतिनिधी**

मरणानंतर जात पुसण्याचे समाजात एकोपा नोंदविण्याचे काम कांतराव देशमुख यांनी करताना एक गाव एक स्मशानभूमी या चळवळी उभी केली. या चळवळीतून त्यांनी जातीयवाद संपविण्याचा प्रयत्न करण्यात आला. आपण समाजाचे देणे लागतो या उक्ती प्रमाणे मराठवाडा मित्र परिवार नवी मुंबई च्या वतीने एका गाव दत्तक घेण्याची कल्पना दिली.मराठवाडा मित्र परिवार नवी मुंबई तर्फे मराठवाडा मुक्ती संग्राम दीन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री कांताराव देशमुख (कृषिभूषण पुरस्कार- महाराष्ट्र राज्य) श्री इंद्रजित भालेराव (सुप्रसिद्ध कवी) श्री उमेश जगताप (सिने अभिनेता), भिवडी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, पनवेल महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये यांच्यासह शेकडो मराठवाडा रहिवाशी उपस्थित होते. मराठवाडा मित्र परिवार, नवी मुंबई ही संस्था गेल्या १३ वर्षापासून मराठवाड्यातुन कामानिमीत्त व व्यवसायानिमित्त नवी मुंबईत स्थलांतरीत झालेल्या व वास्तव्यास असलेल्या लोकांसाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक व समाज उपयोगी कार्य करत आली आहे. यावेळी सिने अभिनेता उमेश जगताप यांनी आपल्या जीवनात आलेल्या आठवणींना उजळा देत. श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. माणसाने जीवनात मिळेल ते काम करण्याची करण्याची तयारी ठेवली पाहिजे. ती तयारी ठेवली म्हणून तर त्याला कोणतीही गोष्ट अशक्य नाही. माणसांनी जमिनीवर चालण्याची सवय ठेवली पाहिजे असे त्यांनी सांगितले. यावेळी सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम च्या आठवणी जागृत केल्या. त्यांनी शेतकऱ्याच्या दर्दभरी जीवनावर प्रसिद्ध केलेल्या कविता सादर केल्या.एक गाव एक स्मशानभूमी' ही चळवळ परभणी जिल्ह्यातील झरी गावातून सुरू झाली. झरी गावात लोकसंख्या वीस हजार आहे. तेथे विविध जाती-धर्मांचे लोक राहतात. त्यांच्या प्रत्येकाच्या स्मशानभूमी असल्या तरी त्यांपैकी बहुतांश स्मशानभूमी गैरसोयीच्या विळख्यात सापडल्या होत्या. तेथे माणसांची 'मरणानंतरही छळातून सुटका होत नसल्याचे' चित्र होते. ते गावकऱ्यांना अस्वस्थ करत असे. गावातील प्रगतिशील शेतकरी कांतराव देशमुख यांच्या मनात गावात चांगली स्मशानभूमी असावी असा विचार आला आणि त्यांनी ते चित्र बदलून टाकले ! अर्थात त्यासाठी वीस वर्षे लागली. कांत देशमुख यांनी स्वतः एक एकर जमीन त्याकरता २००१ साली विकत घेतली. ती गावापासून एक किलोमीटर दूर अंतरावर, नदीजवळ आहे. त्यांनी ती जमीन स्मशानभूमीसाठी दान केली ! जिल्हा परिषदेच्या निधीतून स्मशानभूमीला संरक्षक भिंत व आतमध्ये शेड बांधण्यात आली. त्या स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यास सुरुवात मागासवर्गीय व्यक्तीपासून झाली. तेव्हाच कांतराव देशमुख यांना 'एक गाव एक स्मशानभूमी' ही कल्पना सुचली. त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने सर्व जाती-धर्मीयांसाठी योग्य असा कायापालट स्मशानभूमीचा केला ! स्मशानभूमीचे स्वरूप सुसज्ज आहे. समाजिक परिवर्तन, शेती विकास, उद्योग, जलसंवर्धन, वृक्षारोपण, एक गाव एक स्वच्छ आणि सुंदर स्मशानभूमी आदी कार्यामुळे सबंध महाराष्ट्रात स्वत:सह परभणीचे नाव पोहचवणारे व्यक्तिमत्व म्हणून कृषीभूषण कांतराव काका देशमुख यांची ओळख आहे.स्मशानभूमीत एका वेळी तीन हजार लोक बसू शकतील अशी सिमेंटची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. स्मशानात बसण्यासाठी सिमेंटचे बेंच करण्यात आले आहेत. त्यांवर मृत पावलेल्या व्यक्तींची नावे टाकून त्यांच्या स्मृती जागवण्यात येतात. रात्रीच्या वेळी स्मशानभूमीत विजेची जोडणी आणि पाण्यासाठी हातपंप व बोअरवेल यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अंत्यविधी रथाची (ट्रॅक्टर) सोय मोफत आहे. त्यास स्वर्गरथ असे म्हटले जाते. खाजगी कंपनीकडे तशा वाहनाचे भाडे पाच हजार रुपयांपर्यंत असते. तो सात लाख रुपयांचा रथ कांत यांची कन्या मेघा देशमुख यांनी उपलब्ध करून दिला आहे समाजिक परिवर्तन, शेती विकास, उद्योग, जलसंवर्धन, वृक्षारोपण, एक गाव एक स्वच्छ आणि सुंदर स्मशानभूमी आदी कार्यामुळे सबंध महाराष्ट्रात स्वत:सह परभणीचे नाव पोहचवणारे व्यक्तिमत्व म्हणून कृषीभूषण कांतराव काका देशमुख यांची ओळख आहे.

# घरपट्ट्यांपासून वीजदर कपात पर्यंत सर्व वचने पूर्ण करू-ना.चंद्रशेखर बावणकुळे

## भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगरतर्फे जैन भवन येथे कार्यकर्ता सन्मान सोहळ्याचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रम आणि जनतेच्या विश्वासामुळेच महाराष्ट्रात विकासाचे सरकार स्थापन झाले. आपल्या एका मताने विकसित भारताचा संकल्प पूर्ण होत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी आत्मविश्वासाने आगामी सर्व निवडणुकांत विजय मिळवून कमळ फुलवावे,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारघरपट्ट्यांपासून वीजदर कपातीपर्यंत सर्व वचने पूर्ण करणारअसे प्रतिपादन महसूल मंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावणकुळे यांनी केले.भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगरतर्फे जैन भवन येथे कार्यकर्ता सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.या कार्यक्रमाला राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर,आमदार किशोर जोरगेवार,माजी आमदार सुधाकर कोहळे,महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे,ज्येष्ठ नेते विजय राऊत,माजी महापौर राखी कंचर्लावार,महिला आघाडी अध्यक्ष छबु वैरागडे,युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहिर,नामदेव डाहुले,युवा मोर्चा अध्यक्ष मयूर हेपट,महामंत्री रवी गुरुनुळे,श्याम कनकम,मनोज पाल,सविता दंढारे,विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकूर,महिला अध्यक्ष वंदना हजारे,मंडळ अध्यक्ष प्रदीप किरमे,विनोद खेवले,सुभाष अदमाने,स्वप्निल डुकरे,अरुण तिखे यांच्यासह माजी नगरसेवक व इतर पदाधिकाऱ्यांची मंचावर उपस्थिती होती.




बावणकुळे म्हणाले की,तीन कोटी सतर लाख मतांची ताकद घेऊन आणि ५१ टक्क्यांहून अधिक मते मिळवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेत आले. हे यश इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनाही शक्य झाले नाही,मात्र कार्यकर्त्यांच्या जोरावर आपण ते घडवून आणले. ते पुढे म्हणाले की,या कार्यकर्त्यांच्या ताकदीमुळे शेतकऱ्यांकडून वीजबिल न घेण्याचा ऐतिहासिक निर्णय घेता आला. घरपट्ट्यांसह ३६ महत्त्वाच्या विषयांवर निर्णय झाले असून ५० हजार नागरिकांना कायमस्वरूपी पट्टे देण्यात येणार आहेत. विजेचे दर कमी करून साडे पाच रुपये प्रति युनिट एवढीच वसुली करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. महाराष्ट्राला देशातील सर्वात विकसित राज्य करण्याचा त्यांचा संकल्प आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बाबत बावणकुळे म्हणाले की, नगरपरिषद,जिल्हा परिषद आणि महानगरपालिका या सर्व निवडणुका आपण जिंकल्या पाहिजेत. आपले सरकार हे वचनपूर्ती करणारे,विकासाच्या माध्यमातून काम करणारे सरकार आहे. ओबीसींवर अन्याय होणार नाही,त्यांच्या हक्काच्या एका टक्यालाही कुणाचा हात लागणार नाही. प्रत्येक समाजाला समान न्याय देणे हीच आमची भूमिका आहे. चंद्रपूरातील प्रत्येक घराला आखीव प्रपत्रिका देण्यात येणार असून गरिबांना घरासाठी अडीच लाख रुपयांची मदत मिळणार आहे. या सर्व योजना कार्यकर्त्यांनी प्रत्येक घराघरात पोहोचवल्या पाहिजेत. आमदार किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वात चंद्रपूर शहरात उत्तम कार्यकारिणी तयार झाली आहे. पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता हा कार्यक्षम आहे. जोरगेवार यांचे नेतृत्व आणि हंसराज अहिर यांचे मार्गदर्शन आपल्याला लाभले आहे. मतदारसंघातील कामे करण्यासाठी जोरगेवार यांची धडपड आम्ही पाहिली आहे. उत्तम काम करणाऱ्या दहा आमदारांमध्ये त्यांचे नाव आहे. त्यांच्या कामामुळे ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असून मुख्यमंत्री त्यांना कधीच खाली हाताने पाठवत नाहीत. त्यामुळे आपल्या प्रभागातील परिसरातील कामे आपण करून घ्यावीत,नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात,असे ते कार्यकर्त्यांना संबोधित करताना म्हणाले. या कार्यक्रमात बोलताना राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर म्हणाले की,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छ मंत्रीमंडळ कार्यरत आहे. नागरिकांना घरे देण्याचा घेतलेला निर्णय हा मोठा असून यामुळे नागरिकांची जुनी मागणी पूर्ण होणार आहे. या सरकारमुळे राज्याच्या विकासाला गती मिळत आहे. यावेळी आमदार जोरगेवार म्हणाले की, घरपट्ट्याच्या मागणीसंदर्भात मंत्री बावणकुळे यांनी तात्काळ मुंबईत बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावला. सत्तेचा लाभ शेवटच्या घरापर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांच्या माध्यमातून सुरू आहे.चंद्रपूरमध्ये आयोजित माता महाकाली महोत्सवादरम्यान निघणारी पालखी ही विदर्भातील सर्वात मोठी पालखी असून या मंदिर परिसराच्या विकासासाठी राज्य सरकार सकारात्मक असल्याचेही ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रगती करत असून चंद्रपूर मतदारसंघाचाही विकास होत आहे. येणाऱ्या सर्व निवडणुका भारतीय जनता पक्ष जिंकणार असल्याचा विश्वास यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला. या वेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना ना. चंद्रशेखर बावणकुळे यांच्या उपस्थितीत सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यकर्ता मेळाव्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून,येणाऱ्या निवडणुकांत विजयाची पताका फडकवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# ओल्या दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार-आ.प्रताप अडसड

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक संकटामुळे खचून जाऊ नये, अशी आश्वासक घोषणा आमदार प्रतापदादा अडसड यांनी केली. त्यांनी सांगितले की, ओल्या दुष्काळामुळे प्रभावित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी प्रशासनाला सर्वेक्षण करून परिपूर्ण अहवाल शासन दरबारी पाठवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शनिवार, २१ सप्टेंबर २०२५ रोजी तहसील कार्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावर, गतवर्षी जिल्हा नियोजनातून मंजूर झालेल्या दीड कोटी रुपयांच्या निधीतून बांधण्यात आलेले तालुका कृषी अधिकारी कार्यालय उद्घाटन आ. प्रतापदादा अडसड यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला तहसीलदार अभय घोरपडे, कृषी निविष्ठा संघटनेचे अध्यक्ष राधेश्याम मुंदडा, तालुका कृषी अधिकारी गजानन राऊत, कृष्णा मारोडकर, प्रवीण खैरकार, प्रणय राजनकर, दर्शन राठी यांची उपस्थिती लाभली.




तहसीलदार अभय घोरपडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या समस्या त्वरित सुटाव्यात यासाठी तहसील कार्यालयात कृषी व महसूल समन्वय केंद्र उभारण्यात येणार आहे.

उद्घाटनानंतर तालुक्यातील वर्षभर नाविन्यपूर्ण पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांचा आ. प्रतापदादा अडसड यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये नामदेव वैद्य, सतीश कुयटे, गौरव राऊत, रवी नवरंगे, शुभम मोहोड, गोपाल भोयर, सुनील घुबडे, नितीन देशमुख, संदीप निकम, गजानन नाईक, कल्याण राघोते, विक्रम पेलणे, सचिन बांडाबुचे, जयंत बमनोटे यांचा समावेश होता.

युवा शेतकरी सतीश कुयटे यांनी सांगितले की, वडिलोपार्जित तीन एकर शेतीवरून दरवर्षी भेंडी, टरबूज, कोबी यांसारखी नाविन्यपूर्ण पिके घेतली जातात. या उत्पादनातून घर, गाडी व बँक बॅलन्स उभारता आला. बालाजी फाउंडेशनच्या मार्गदर्शनामुळे हे शक्य झाले.

सतत पडणाऱ्या पावसामुळे साचलेले पाणी बाहेर कसे काढावे, तसेच सोयाबीन, तूर, कपाशी या पिकांवर झालेल्या प्रादुर्भावावर उपाय कसा करावा, यावर बालाजी फाउंडेशनचे चे. विवेक चर्जन यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी गजानन राऊत यांनी केले, संचालन रुपाली करडे यांनी केले तर आभार पितांबर जिभकाटे यांनी मानले. यावेळी राजेश वालदे, धीरज ढगे, प्रवीण लोणारे, नासीर अली, शैलेश उके व कृषी सहाय्यक यांनी अथक परिश्रम घेतले.

# झडपोली येथे डहाणू विधानसभा कार्यकर्त्यांची बैठक संपन्न



**पालघर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने, निलेश सांबरे (उपनेता शिवसेना तसेच संस्थापक अध्यक्ष जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था) यांच्या उपस्थितीत झडपोली येथे डहाणू विधानसभा क्षेत्रातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली.या बैठकीस शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुका पूर्ण ताकदीने लढवून जिल्हा परिषदेचा अध्यक्ष शिवसेना पक्षाचाच होईल, असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. यासाठी दिवस-रात्र मेहनत करून पक्षवाढीसाठी काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली. पक्ष वाढीसाठी लागेल ती सर्व मदत केली जाईल, असे निलेश सांबरे यांनी सांगितले.

बैठकीत डहाणू तालुक्यातील बोर्डी गटातील नवनियुक्त तरुणांना पदनियुक्तीपत्र देण्यात आले. यात उपतालुका प्रमुखपदी मुकेश एकनाथ मोहिते, विभागप्रमुखपदी संकेत सुरेश माच्छी व निखिल विलास माने, शाखा प्रमुखपदी ध्रुवेश मुकेश माच्छी, दीपक महेश दुबळा व जयंत गणपत हडळ, उपशाखा प्रमुखपदी विपुल इशू राठोड, उमंग दीपक माच्छी व आदिल राजेश कवटे यांची निवड करण्यात आली.या बैठकीला जावेद खान (पालघर लोकसभा प्रमुख, जिजाऊ संघटना), समीर सागर (उपजिल्हा प्रमुख, शिवसेना), कल्पेश भावर (डहाणू विधानसभा अध्यक्ष, जिजाऊ संघटना), हेमंत धर्ममेहर (डहाणू तालुका अध्यक्ष, शिवसेना), सुनील इभाड (डहाणू विधानसभा क्षेत्र प्रमुख, शिवसेना), प्रताप धोडी (डहाणू तालुका अध्यक्ष, जिजाऊ संघटना), विजय माळी (डहाणू विधानसभा संघटक), विजय सिंग राजपूत आणि ओमप्रकाश रावत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### म्हसदी प्र.नेर गावातील आदिवासी समाजाचा हरित उपक्रम

# गेल्या वर्षभरात ४०० आंब्यांची लागवड रविवारी आणखी ५० झाडे लावली

**धुळे । प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनासाठी आदिवासी समाज पुढाकार घेत असल्याचे प्रेरणादायी चित्र साक्री तालुक्यातील म्हसदी प्र.नेर गावात पाहायला मिळाले. गावातील आदिवासी बांधवांनी सामूहिक श्रमदानातून सरकारी जमिनीवर गेल्या वर्षभरात तब्बल ४०० आंब्यांची लागवड केली आहे. या हरित उपक्रमामुळे परिसरात हरितक्रांतीचे नवे पर्व सुरू झाले आहे.

आज रविवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी या उपक्रमाचा पुढील टप्पा म्हणून आणखी ५० आंबा तसेच विविध फळझाडे आणि उपयुक्त वृक्षांची लागवड करण्यात आली. या निमित्ताने गावातील तरुण, ज्येष्ठ नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.



या वेळी निसर्गप्रेमी सुभान पिंजारी, नाईक रमेश पवार, बापू सोनवणे, अविनाश पवार, गणेश मोरे, भुरा अहिरे, सुनिल मालुसरे, महेंद्र सोनवणे, विष्णू कुवर, लक्ष्मण सोनवणे आदींनी श्रमदान करून वृक्षलागवड केली. वृक्षलागवडीबाबत बोलताना बापू सोनवणे म्हणाले,गावातील भविष्यासाठी हरित वारसा निर्माण करणे हीच खरी पिढ्यांची सेवा आहे. या झाडांमुळे पुढील काळात गावाला सावली, फळे तसेच स्वच्छ हवा मिळणार आहे.

स्थानिक समाजाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, आदिवासी बांधवांच्या कार्यातून पर्यावरणाबाबतची जाणीव आणि एकात्मतेचा संदेश दिला जात आहे.

# निरोगी शरीरासाठी विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ खेळावेत-सुधीर अकलाडे

**धुळे । प्रतिनिधी**

आजच्या यांत्रिक जीवनशैलीत शारीरिक तंदुरुस्ती राखण्यासाठी मैदानी खेळ अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन भाजपा किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष व ग्रामपंचायत देगावचे उपसरपंच सुधीर अकलाडे यांनी केले.

शेवाळी (दा.) येथील शांतीवन अध्यापक विद्यालयाच्या मैदानावर तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खो-खो व कबड्डी स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धेदरम्यान बोलताना सुधीर अकलाडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी नियमितपणे मैदानी खेळ खेळले पाहिजेत. स्पर्धेत उपविजेता होणे हा पराभव नसून पुढील विजयाकडे टाकलेले पहिले पाऊल आहे. सराव वाढवून भविष्यात विजेता होण्याचे स्वप्न पूर्ण करावे.



या स्पर्धेत वर्धाने येथील माध्यमिक विद्यालय व दुसाने येथील माध्यमिक विद्यालय विजेते ठरले. तर कासारे येथील खानदेश गांधी बाळूभाई मेहता माध्यमिक विद्यालय व आदर्श माध्यमिक विद्यालय निजामपूर हे उपविजेते ठरले. विजेते व उपविजेते संघांना साक्री पंचायत समितीचे माजी सदस्य तसेच कबड्डीपटू कै. अरुण मुरलीधर अकलाडे यांच्या स्मरणार्थ सुधीर अकलाडे यांच्या तर्फे ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शांतीवन अध्यापक विद्यालयाचे चेअरमन अरुण नेरकर होते. यावेळी भाजपा किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सुधीर अकलाडे, शेतकी संघाचे माजी संचालक अविनाश खैरनार, क्रीडा शिक्षक संजय भामरे, नितीन खैरनार, एच.डी. देसले, विकी सोनवणे, प्रशिक्षक धनंजय सोनवणे, अनिल खैरनार यांच्यासह तालुक्यातील क्रीडा शिक्षक, विद्यार्थी व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी साक्री तालुका क्रीडा संकुल, तालुका संयोजन समिती, तालुका क्रीडा महासंघ व तालुका युवा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत महिला व किशोरवयीन मुलींची शहरात तपासणी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनच्या ७२ व्या वर्धापन दिनानिमित्त स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान अंतर्गत महिलांसाठी आणि किशोरवयीन मुलींसाठी विशेष आरोग्य तपासणी व सर्वरोग निदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात गरोदर माता, बाळंतीण महिला तसेच किशोरवयीन मुलींना आरोग्य तपासणी करुन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

शहरातील जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या या शिबिराचे उद्घाटन माजी नगरसेविका संगीताताई गणेश भोसले, मीनाताई संजय चोपडा व जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख, जायंट्स ग्रुपचे अभय मुथा, अमित धोका, नूतन गुगळे, आयटीआय संस्थेच्या देशमुख मॅडम, सौ. पुरी आदी उपस्थित होत्या.

संगीताताई भोसले म्हणाल्या की, आधुनिक जीवनशैलीत महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तनाचा कर्करोग अशा आजारांचे लवकर निदान होणे अत्यंत आवश्यक असून, अशा शिबिरांमुळे महिलांना योग्य वेळी उपचार मिळाल्यास भविष्यातील धोके टाळता येऊ शकणार असल्याचे ते म्हणाले.

महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख यांनी सांगितले की, या शिबिरांमुळे किशोरवयीन मुलींना आरोग्य व स्वच्छतेबाबत योग्य मार्गदर्शन मिळते. तसेच गरोदर व बाळंतीण मातांची तपासणी झाल्यामुळे मातामृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यास मदत होणार असल्याचे स्पष्ट केले.

जायंट्स ग्रुपतर्फे डिजिटल ब्लड प्रेशर मॉनिटर हे उपकरण जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देण्यात आले. व्यसनमुक्तीच्या जनजागृतीसाठी तंबाखू व सिगारेटच्या दुष्परिणामांवर आधारित पोस्टरचे यावेळी विमोचन करण्यात आले. या शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांची तपासणी करून उपचार केले. यात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. जयश्री रोराळे, बालरोगतज्ज्ञ डॉ. आशिष इंगळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख, डॉ. कटारिया, आहारतज्ज्ञ नम्रता मकासरे, दंततज्ज्ञ डॉ. विश्वजित देशमुख, नेत्रतज्ज्ञ डॉ. राजेंद्र गायकवाड, डॉ. कमल गायकवाड, योगतज्ज्ञ डॉ. सुरेखा खोसे, मेघांजली मध्येतू, एक्स रे टेक्निशीयन अच्युत घुमरे, क्षयरोग विभागाचे अमोल पागिरे, शीतल नरवडे तसेच इतर वैद्यकीय अधिकारी व नर्सिंग स्टाफ सहभागी झाले होते.

जायंट्स ग्रुप गेल्या ४० वर्षांपासून विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवीत आहे. सेवा सप्ताहानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, जनावरांची मोफत तपासणी, वृक्षारोपण, अंमली पदार्थविरोधी जनजागृती, स्तनाचा कर्करोग जनजागृती तसेच मुकबधिर विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा यांसारखे उपक्रम घेण्यात आले असल्याची माहिती संजय गुगळे यांनी दिली.



# मायभूमी फाउंडेशन आयोजित राज्य स्तरीय स्नेह मेळावा पुणे येथे संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

मायभूमी फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय स्नेह मेळावा दि २२ रोजी अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पुणे या ठिकाणी पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवर आणि सर्व सन्माननीय समाजसेवकांच्या स्वागताने झाली. उपस्थित मान्यवर, कार्यकर्ते, आणि समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्ती यांच्या उपस्थितीमुळे मेळाव्याला एक वेगळाच उंचाव मिळाला. सर्वांनी एकत्र येऊन समाजाच्या प्रगतीसाठी दिशा देण्याचे कार्य केले. या मेळाव्यात सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक प्रश्नांवर सखोल चर्चा झाली. समाजातील बदलते प्रवाह, नव्या पिढीसमोरील आव्हाने आणि त्यावर मात करण्याचे उपाय याबाबत मान्यवरांनी मार्गदर्शन केले. सामाजिक स्तरावर एकात्मता आणि सहकार्य या भावनेने काम केल्यासच खऱ्या अर्थाने बदल घडवता येईल, हे या चर्चेतून अधोरेखित झाले.शिक्षण क्षेत्रातील आव्हाने हीदेखील महत्त्वाची बाब होती. गावागावातील शैक्षणिक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नवे उपक्रम राबवण्याची गरज सर्वांनी मान्य केली. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास वाढावा आणि ग्रामीण भागातील शाळा आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडल्या जाव्यात यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे ठळकपणे मांडले गेले. आरोग्य हा प्रत्येक समाजाच्या प्रगतीचा पाया आहे. ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सुविधांतील विषमता दूर करण्यासाठी वैद्यकीय शिबिरे, आरोग्य जनजागृती मोहीम आणि सरकारी योजनांचा योग्य फायदा लोकांपर्यंत पोहोचवणे किती महत्त्वाचे आहे, यावर सखोल चर्चा झाली.या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे गाव पातळीवरील समस्यांवर थेट संवाद झाला. गावातील पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य सुविधा, तसेच तरुणांना रोजगाराच्या संधी या विषयांवर खुलेपणाने चर्चा होऊन उपाययोजना शोधल्या गेल्या. समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या क्षमतेनुसार हातभार लावला, तर समाज उन्नतीकडे वाटचाल करू शकेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.संपूर्ण कार्यक्रमामध्ये प्रत्येक मान्यवराचे विचार, सूचना आणि मार्गदर्शन



समाजासाठी अमूल्य ठरले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी एकत्रितपणे समाजातील प्रत्येक स्तरावर सकारात्मक बदल घडवून आणण्याचा संकल्प केला. अशा प्रकारे राज्यस्तरीय स्नेह मेळावा हा केवळ एकत्र येण्याचा सोहळा न ठरता समाज परिवर्तनाची दिशा देणारं व्यासपीठ ठरलं. या मेळाव्याच्या माध्यमातून समाजातील प्रश्न सोडवण्याची नवी उमेद आणि आशा सर्वांच्या मनात निर्माण झाली संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय बाबासाहेब वाव्हळे यांनी पुढे बोलत असताना स्पष्ट केले की संघटनेमध्ये टीमवर्क असेल तर कुठलेही काम अतिशय उत्स्फूर्तपणे होते यासाठी आपणा सर्वांना यामध्ये झोकून द्यावे लागेल आणि पुढे चालावे लागेल. त्यामुळे समाजातील विविध घटकांचा विकास करण्यामध्ये आपण अग्रेसर होऊ संघटनेमध्ये प्रत्येक सदस्याने एकमेकांचा आदर केला पाहिजे असे प्रतिपादन साहेब यांनी केले. या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिलेले श्री सोनकांबळे सर यांनी देखील सखोल मार्गदर्शन केले आणि संघटनेला माजी कुठल्याही प्रकारची मदत लागली असेल किंवा लागत असेल तर कधीही मला कॉल करा मी आवर्जून तुमच्या पाठीशी उभा राहील असे ठामपणे आपले मत त्यांनी व्यक्त केले. आयु. बाबासाहेब वाव्हळे, आयु. सचिन उजगरे, आयु.भीमराव उजगरे, आयु.बबन डोंगरे, आयु.दीपक उजगरे,आयु.भारत उजगरे,आयु.अभिमान उजगरे, आयु.बाबुराव उजगरे,आयु.धर्मराज शिंदे,आयु.नितीन वाव्हळे,आयु समिर वाव्हळे,आयु. कपिल उजगरे,आयु.ब्रह्मानंद शिंदे, आयु.अजय उमाप,आयु रंभाजी उजगरे,आयु.अर्णव उजगरे, आयु.राहुल उजगरे,आयु.वैभव वाव्हळे, आयु.कानिफनाथ उजगरे,आयु.बाळा किरवले, आयु.सुरज उजगरे. आदी कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# तुळजापूर ते सोनपेठ अखंड ज्योतीचे वैद्यनाथ मंदिरात भव्य स्वागत

**परळी । प्रतिनिधी**

तुळजापूर-शिरसी बुद्रुक-शिरोरी-लोही ग्राम या तीन गावांच्या वतीने निघालेली अखंड ज्योत काल परळी नगरीत दाखल झाली. वैद्यनाथ प्रभूच्या पायऱ्यांवर ज्योत पोहोचताच अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी ज्योतीचे पूजन उपजिल्हा रुग्णालयाचे प्रमुख डॉ. अरुण गुट्टे व त्यांच्या सौभाग्यवती यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाला अ. भा. वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष रामेश्वर महाराज कोकाटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, पाटलोबा मुंडे, दहिवाळ, जीवण अण्णा शिंदे, प्रल्हाद शेळके, हभप मंगेश महाराज मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.ज्योत घेऊन आलेल्या



१५१ भाविकांचे फेटे बांधून, पुष्पगुच्छ देऊन व चहापाणी करून सत्कार करण्यात आला. तसेच या ज्योतीचे प्रमुख मार्गदर्शक व अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे सोनपेठ तालुका अध्यक्ष शिवाजीराव फले पाटील यांचाही सत्कार करण्यात आला.या प्रसंगी डॉ. अरुण गुट्टे, वैजनाथराव सोळंके, फले पाटील, पाटलोबा मुंडे व रामेश्वर महाराज कोकाटे यांनी उपस्थित भाविकांचे कौतुक करत सर्वांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

# नंदुरबारच्या विकासासाठी आणि शांततेसाठी गावित कुटुंबियांची खोडाई मातेकडे प्रार्थना

**नंदुरबार । दिपक गोसावी**


नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी, माजी मंत्री डॉ. विजयकुमार गावित, माजी खासदार डॉ. हिना गावित आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित यांनी नंदुरबार येथील ग्रामदैवत खोडाई मातेच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांनी संपूर्ण जिल्ह्यासाठी सुख, समृद्धी, आरोग्य आणि शांततेची प्रार्थना केली.याप्रसंगी बोलताना डॉ. विजयकुमार गावित म्हणाले, नवरात्री म्हणजे शक्तीची उपासना. खोडाई मातेच्या आशीर्वादाने जिल्ह्यात शांतता नांदो आणि प्रत्येकाचे जीवन समृद्ध होवो, हीच आमची प्रार्थना आहे.माजी खासदार डॉ. हिना गावित यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. आई खोडाई मातेच्या आशीर्वादाने



नंदुरबार जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा आणि महिलांना एक नवी ऊर्जा मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

नवरात्रोत्सवामुळे मंदिरामध्ये उत्साहाचे वातावरण होते. आकर्षक रोषणाई आणि सजावट करण्यात आलेली होती. देवीच्या दर्शनासाठी शहरातून आणि आसपासच्या भागांतून मोठ्या संख्येने भाविक येत होते. खोडाई मातेच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. नवरात्रीनिमित्त मंदिरात विशेष पूजा आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# अखेर वडाळी ग्रामपंचायत प्रशासनास आली जाग



**लाला चव्हाण । वडाळी**

शहादा तालुक्यातील वडाळी येथील ग्रामपंचायतीच्या दुर्लशामुळे राम रथ गेल्या वर्षभरापासून नादुरुस्त असल्याने येथील गावकऱ्यांना मृत् देहाची अवहेलना करत खांद्यावर उचलून न्यावा लागत असे परिणामी नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत होता. ग्रामस्थांच्या मागणीनुसार

या घटनेचे गांभीर्य घेत जनतेच्या हित जोपासत दोन दिवसांपूर्वी वादळ वार्ता ला वडाळी येथे ग्रामपंचायतिच्या दुर्लक्ष मशानभूमीपर्यंत जाण्यासाठी नागरिकांची परवड या मथळ्याखाली बातमी प्रकाशित करण्यात आली होती.

या बातमीची दखल घेत वडाळी ग्रामपंचायत प्रशासनाने अकॅशन मोडवर येत नुकतीच रामरथाचे टायर टाकून दुरुस्ती करत सुधारणा करण्यात आल्याने ग्रामस्थांनी वादळ वार्ता विशेषतः आभार मानले.

# शिक्षण वाचविण्यासाठी उसळली जनआक्रोश रॅली

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद अभियान या उपक्रमांतर्गत शहरासह तालुका स्तरावरून आलेल्या विद्यार्थी, पालक, सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले.ही रॅली माळीवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून प्रारंभ झाली. त्यानंतर मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. अखेरीस रॅली जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहोचली आणि निवेदन देऊन संपन्न झाली. हातात सरकारी शाळा वाचवा, मोफत शिक्षण आमचा हक्क,




शिक्षण कुणाच्या मालकीचं नाही अशी पोस्टर्स घेऊन निघालेल्या विद्यार्थी-पालकांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून टाकला.

रॅलीतून मांडण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये - शिक्षणातील खाजगीकरण रोखणे, लहान शाळा बंद करण्याचे धोरण थांबवणे, वाड्या-वस्त्यांवरील शाळा कायम ठेवणे, अंगणवाडीपासून उच्च शिक्षणापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून देणे, खासगी शाळांतील विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाने भरणे, सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलांचे शिक्षण सरकारी शाळेत सक्तीने घ्यावे, आमदार-खासदार निधीतून शाळा दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करून द्यावा आणि शिक्षण विभागातील रिक्त पदे तातडीने भरावीत, अशा मागण्या होत्या.मुख्य संयोजक सुदाम लगड यांनी सांगितले की, शासकीय व अशासकीय आश्रमशाळांमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता, शिक्षक टंचाई, व्यवस्थापनातील त्रुटी, शैक्षणिक दर्जा खालावणे, विद्यार्थी समस्या, पालकांचा कमी सहभाग आणि यंत्रणेत समन्वयाचा अभाव या गंभीर मुद्द्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. शिक्षण सर्वांसाठी समान आणि मोफत व्हावे हा आमचा ठाम आग्रह आहे.या आंदोलनाला रावसाहेब क्षेत्रे, कॉम्रेड प्रवीण सोनवणे, कॉम्रेड संदिप सकट, सुनिल ढोले, विजय भारस्कर, योगेश साबळे, लक्ष्मण शिंदे, जालू शेलार, राहूल ठोकळ, रुपेश जगधने, जालिंदर निकम, कृष्णा लोहकरे, अलीशा गर्जे, लोककलावंत अनंत द्रविड, ड. जितेंद्र आढाव, प्रा. श्याम शिंदे, प्रा. बापू चंदनशिवे आदींसह शेकडो विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

# राज्यातील बोगस दिव्यांगांची झाडाझडती घ्या तुकाराम मुंढेंचे झेडपी मुख्याधिकाऱ्यांना आदेश

**मुंबई (वृत्तसंस्था)**-आपल्या धडाडीच्या कामासाठी ओळखले जाणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे पुन्हा एकदा क्शन मोडवर आले आहेत. सध्या राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून कार्यरत असलेल्या मुंढे यांनी, बोगस दिव्यांग प्रमाणपत्र वापरून सरकारी योजनांचा लाभ घेणाऱ्यांविरुद्ध मोठी मोहीम हाती घेतली आहे. त्यांनी राज्यातील सर्व ३४ जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना यासंदर्भात लेखी आदेश दिले आहेत.या आदेशानुसार, जिल्हा परिषदेतील शिक्षण, आरोग्य, बांधकाम यासह सर्व विभागांतील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. या आदेशामुळे बोगस प्रमाणपत्र वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

तुकाराम मुंढे यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून त्यांच्या भूमिकेचे स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. त्यांना समाजात योग्य स्थान मिळवून देणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे आपले कर्तव्य आहे. 'समावेशन, सन्मान आणि समान संधी' यावरच खऱ्या अर्थाने सक्षम समाजाची पायाभरणी होते, असेही त्यांनी म्हटले आहे.दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, बोगस दिव्यांग व्यक्तीला दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. दिव्यांग कल्याण



विभागाकडे अशा अनेक तक्रारी आल्या आहेत, ज्यात अनेक कर्मचारी बोगस दिव्यांगत्वाचा लाभ घेत असल्याचे म्हटले आहे. या तक्रारींची दखल घेऊन मुंढे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना महिन्याभरात तपासणीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.जर एखाद्याचे प्रमाणपत्र बनावट किंवा चुकीचे आढळले, किंवा दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा कमी असेल, तर अशा कर्मचाऱ्यांना मिळणारे सर्व लाभ तात्काळ बंद करावेत आणि त्यांनी आतापर्यंत घेतलेल्या लाभांवर कारवाई करावी, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या मोहिमेमुळे खऱ्या दिव्यांगांना त्यांच्या हक्कांपासून वंचित राहावे लागणार नाही, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.तुकाराम मुंढे हे २००५ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. ऑगस्ट २००५ मध्ये सोलापूर येथून प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकारी म्हणून त्यांनी प्रशासकीय कारकिर्दीची सुरुवात केली. त्यानंतर, विविध जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि सचिवपदी त्यांची धडाकेबाज कामगिरी चर्चेत राहिली. कर्मचाऱ्यांना कडक शिस्त लावण्याच्या हेतूनं तुकाराम मुंढे निर्णय घेतात. तेच त्यांच्या बदलीचं कारण ठरते, अशी चर्चा नेहमीच असते. शिवाय स्थानिक लोकप्रतिनिधींशी फारसं जमत नसल्यामुळेही त्यांच्या नियुक्तीला अनेकजण विरोध करत असल्याचा आतापर्यंतचा इतिहास आहे. २० वर्षांच्या कारकीर्दीत त्यांची तब्बल २३ वेळा बदली झाली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077